# सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर
# जुलै महिन्याचा परिचय

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

सिद्धयोग मार्गावर, जुलै हा महिना विशेषतः गुरुपौर्णिमा महोत्सवाशी निगडित आहे. मी "विशेषतः" यासाठी म्हणते आहे, कारण गुरुपौर्णिमा हे चांद्रतिथीनुसार साजरे केले जाणारे पर्व आहे, जे भारतीय पंचांगानुसार आषाढ महिन्याच्या पौर्णिमेला येते आणि पाश्चिमात्य कॅलेंडरनुसार हे बहुतांशी जुलै महिन्यात येते. या वर्षी, २०२६मध्ये गुरुपौर्णिमा २९ जुलै रोजी आहे.

तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर गुरुपौर्णिमेची कथा वाचू शकता की, या पर्वाचा आरंभ कसा झाला, ज्याची पाळेमुळे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत. इथे, मी या कथेचा केवळ सारांश प्रस्तुत करते आहे. हजारो वर्षांपूर्वी महर्षि वेदव्यास यांच्या शिष्यगणांनी गुरुपौर्णिमा पर्वाचा प्रारंभ केला होता. महर्षि वेदव्यासांच्या शिष्यगणांनी त्यांच्या गुरुदेवांना अशी प्रार्थना केली की, आपल्या श्रीगुरूंचा सन्मान व त्यांचे पूजन-वंदन करण्याची तसेच अंतरीची अपार कृतज्ञता अभिव्यक्त करण्याची त्यांची इच्छा आहे. आपल्या शिष्यांविषयीच्या करुणेपोटी महर्षि वेदव्यासांनी शिष्यांना सांगितले की, त्यांनी वर्षातील एक दिवस निवडून तो विशेषतः श्रीगुरूंची पूजा करण्यासाठी समर्पित करावा. शिष्यांनी त्वरितच प्रसन्नतेने आषाढ महिन्यातील पौर्णिमा हा दिवस निवडला. तेव्हापासूनच ही तिथी गुरुपौर्णिमा या नावाने ओळखली जाऊ लागली.

सिद्धयोग्यांसाठी आणि नवीन साधकांसाठी, गुरुपौर्णिमेचा दिवस आणि खरेतर हे पर्व ज्या महिन्यात असते तो संपूर्ण महिना सिद्धयोग परंपरेच्या श्रीगुरूंचे पूजन-वंदन करण्याचा समय आहे : हा समय आहे, गुरुमाई चिद्विलासानंद यांचे पूजन-वंदन करण्याचा, बाबा मुक्तानंदांचे पूजन-वंदन करण्याचा आणि भगवान नित्यानंदांचे पूजन-वंदन करण्याचा. आपण आपल्या गुरुजनांचा सन्मान, त्यांचे पूजन-वंदन *कसे* करू शकतो, हे चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी, आपण नेहमीप्रमाणेच सिद्धयोग मार्गाची वेबसाइट पाहू शकतो.

याचा प्रारंभ करण्याची एक सुंदर पद्धत आहे, गुरुपौर्णिमा-दक्षिणा अर्पण करण्यासाठीचे आमंत्रणपत्र वाचणे, जे लीलावती स्टूअर्ट सट्क्लिफ यांनी लिहिले आहे [खरे सांगायचे झाल्यास, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटच्या होमपेजवर तुम्ही *कुठेही* जरी क्लिक केले, तरी सुरुवात करण्याची ती 'सुंदर पद्धत'च

असेल]. सिद्धयोग महोत्सव साजरे करण्यासाठी आपल्याकडे अभ्यासांचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, त्यांमधून कोणते अभ्यास करावेत याची निवड आपण करू शकतो आणि यामुळेच हे अभ्यास माझ्यासाठी आनंदपूर्ण तसेच रोचक बनतात. तथापि, कधीकधी असा एखादा अभ्यास असतो, ज्यावर आपण एखाद्या विशिष्ट महोत्सवाच्या प्रसंगी विशेषतः केंद्रण करतो. गुरुपौर्णिमेच्या प्रसंगी आपण दक्षिणा या अभ्यासावर केंद्रण करतो. [तुम्हाला जर दक्षिणेविषयी अधिक जाणून घ्यायचे असेल किंवा या अभ्यासाविषयी स्वतःची समज अधिक सखोल करण्याची इच्छा असेल, तर तुम्हाला सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर त्याविषयीची सामुग्री आढळेल—उदाहरणार्थ, सिद्धयोग मार्गाच्या बेबसाइटवर एका सिद्धयोग विदुषीने लिहिलेले भाष्य दिले गेले आहे आणि दक्षिणा या विषयावर एका सिद्धयोग स्वामींसोबत झालेली प्रश्नोत्तरीदेखील प्रकाशित झाली आहे.]

तिथून पुढे आपण आपले केंद्रण आणू शकतो, 'श्रीगुरु-उपासना' यावर. सर्वप्रथम, मी हे सांगू इच्छिते की, वेबसाइटवरील या नवीन शब्दसंग्रहाविषयी तुम्हाला सांगण्याची मी *अतिशय उत्सुकतेने* वाट पाहत होते. आणि मला खूप आनंद होतो आहे की, तो क्षण आला आहे!

तेव्हा गोष्ट अशी आहे की, गुरुपौर्णिमेच्या महिन्याचा आरंभ होणार या विचाराने मी काही आठवड्यांपूर्वी माझ्या काही सहसेवाकर्त्यांना भेटले. आम्हा सर्वांना शब्दांविषयी खूप प्रेम आहे आणि माझे सहसेवाकर्ते संस्कृतसारख्या भारतीय भाषांचे विद्वान आहेत. श्रीगुरुमाईंना अर्पण करण्यासाठी 'गुरू' या विषयाशी संबंधित काही संस्कृत शब्दांची निवड करण्याचे आम्ही ठरवले आणि त्याबरोबरच त्या शब्दांचा इंग्रजी अनुवाददेखील प्रस्तुत करण्याचा विचार केला. यांपैकी अनेक शब्द भारताच्या शास्त्रग्रंथांमध्ये आढळून येतात. काही शब्द श्रीगुरूंच्या स्वरूपाचे वर्णन करतात किंवा श्रीगुरूंविषयीच्या एखाद्या विशिष्ट पैलूचे वर्णन करतात. काही शब्द वर्णन करतात की, श्रीगुरू शिष्याला काय प्रदान करतात. आणि काही शब्द हे समजावून सांगतात की, श्रीगुरूंप्रति शिष्याचा भाव कसा असावा, शिष्याने कोणते प्रयत्न करावेत, कोणते अभ्यास करावेत.

अनेकदा मी हे पाहिले आहे की, जेव्हा एखादी व्यक्ती श्रीगुरुमाईंना एखादी भेट अर्पण करते, तेव्हा श्रीगुरुमाई याचा विचार करतात की, ती भेट सिद्धयोग संघम्पर्यंत कशा प्रकारे पोहोचवता येईल. तुम्हाला कदाचित आठवत असेल की, मी आधीदेखील याविषयी लिहिले आहे की, सुमारे दहा वर्षांपूर्वी कशा प्रकारे मी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटसाठी लिहायला सुरुवात केली होती. मी श्रीगुरुमाईंना पत्रे लिहित असे, ज्यांमध्ये मी साधनेविषयीचे माझे अनुभव आणि माझ्या अंतर्दृष्टी त्यांना सांगत असे. माझी पत्रे वाचून श्रीगुरुमाईंनी मला सांगितले की, मी माझी चिंतनमनने

तुम्हाला सांगावीत! [तो लेख तुम्ही या लिंकवर वाचू शकता, ज्याचे शीर्षक आहे ‘कृतज्ञता, कृतज्ञतेचे स्वरूप♡’ : https://www.siddhayoga.org/2025/november/nature-of-gratitude/exposition/]

आता गुरुपौर्णिमेच्या विषयाकडे परत येऊ या—मी आणि माझ्या सहसेवाकर्त्यांनी मिळून जी शब्दरूपी भेट तयार केली होती, ती आम्ही श्रीगुरुमाईंना अर्पण केली. गुरुमाईंनी अत्यंत कृपापूर्वक आमच्या कार्याचे कौतुक केले आणि हेदेखील लक्षात घेतले की, आम्ही ज्या-ज्या शब्दांची निवड केली होती, त्यांपैकी प्रत्येक शब्द श्रीगुरू, शिष्य आणि गुरू-शिष्य यांच्यातील नाते हे विषय अत्यंत गहनतेने व अर्थपूर्ण रीतीने प्रकट करतो आहे. श्रीगुरुमाईंनी नंतर सांगितले की, सर्व सिद्धयोग्यांनी व नवीन साधकांनी जर या शब्दांविषयी जाणून घेतले, तर ते अतिशय लाभदायक ठरेल. म्हणून, संपूर्ण जुलै महिन्यादरम्यान, प्रत्येक दिवशी, या शब्दांपैकी एक शब्द सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पोस्ट केला जाईल.

जसे की, लवकरच हे स्पष्ट होईल की, या सर्व शब्दांचा आरंभ ‘गुरु’ या शब्दापासून होतो. हे शब्द, संयुक्त किंवा सामासिक शब्द आहेत, अर्थात हे दोन स्वतंत्र शब्द जोडून बनले आहेत आणि या सर्व संयुक्त शब्दांमधील पहिला शब्द आहे, ‘गुरु.’ मी आणि माझे सहसेवाकर्ते जेव्हा या संकलनावर कार्य करत होतो, तेव्हा मला एक सुप्रसिद्ध उपमा आठवली, जी श्रीगुरुमाई आणि बाबा मुक्तानंद यांनी सत्संगांमध्ये दिली आहे. गुरुमाई आणि बाबा हे सांगत असत की, एखाद्या व्यक्तीच्या जीवनात जे काही आहे, ते एक ‘शून्य’च आहे असे समजता येईल. त्या व्यक्तीपाशी अनेक गोष्टी असू शकतात; परंतु त्याचा अर्थ असाच होईल की, त्या व्यक्तीने अनेक शून्यच जमवले आहेत! तथापि, त्या व्यक्तीच्या जीवनात जेव्हा श्रीगुरू येतात आणि ते त्या व्यक्तीच्या अंतरी आत्मज्ञान जागृत करतात, तेव्हा तसे करणे हे त्या सर्व शून्यांच्या आधी ‘१’ हा आकडा लावण्यासमान असते. तेव्हाच त्या शून्यांना खरा अर्थ प्राप्त होतो आणि त्यांचे मूल्य वाढते.

तर, मी थोडक्यात हा एक आढावा दिला आहे, फक्त काहीच विचार व्यक्त केले आहेत की, तुम्हाला गुरुपौर्णिमा महिन्यात सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर काय-काय आढळेल. खरे सांगायचे तर, तुमच्यासाठी अध्ययन-सामुग्रीच्या रूपात जे विशाल भांडार उपलब्ध आहे—शिकवणी, लेख, कथा, स्तोत्रे, छायाचित्रे तसेच आणखीनही खूप काही—त्याची केवळ एक छोटीशी झलक मी तुम्हाला दिली आहे. मी तुम्हाला प्रोत्साहित करते की, संपूर्ण जुलै महिन्यात तुम्ही या सर्व सामुग्रीचे अन्वेषण करावे—

वेबसाइटवर जाऊन ती पृष्ठे पाहावीत, जी गुरुपौर्णिमेचा महोत्सव साजरा करण्यासाठी विशेषत्वाने तयार केलेली आहेत.

असे करण्याचे अनेकानेक लाभ आहेत. या लाभांची गणना करण्यासाठी मी वेगळा एक संपूर्ण लेख लिहू शकते! तथापि, पुन्हा एकदा, त्यांपैकी काही मुख्य लाभांचाच उल्लेख मी इथे करते आहे. माझ्या दृष्टिकोणातून, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर दिलेल्या शिकवणींसह सक्रियतेने कार्य करणे हे असे एक साधन आहे की, ज्याद्वारे आपण गुरू-शिष्य परंपरेचा एक भाग बनतो, जी अनादीकाळापासून चालत आली आहे. या परंपरेच्या अंतर्गत श्रीगुरू आपल्या शिष्याला ज्ञान प्रदान करतात आणि शिष्य ते ज्ञान ग्रहण करून आचरणात आणतो—हाच या परंपरेचा आधार आहे, जो तिला जिवंत ठेवतो. वेबसाइटच्या माध्यमातून श्रीगुरुमाई दररोज त्यांच्या शिकवणी प्रदान करतात. आणि दररोज आपण असे ठरवू शकतो की, आपण या शिकवणींचे अध्ययन करावे, त्यांचा अभ्यास करावा, त्या आत्मसात कराव्यात व आपल्या जीवनात त्यांचे परिपालन करावे. असे केल्याने, आपण आपल्या शिष्यधर्माचे पालन करत असतो, आपल्या श्रीगुरूंचे विद्यार्थी असल्याचे उत्तरदायित्व आपण पार पाडत असतो. आपण या गोष्टीकडे लक्ष देतो की, श्रीगुरूंचे ज्ञान, त्यांचा प्रकाश आपल्या या जगात सर्वत्र पसरावा.

मी हेदेखील अनुभवले आहे की, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर दिलेल्या शिकवणींच्या अध्ययनामुळे आणि त्याच्या फलस्वरूप, गुरू-शिष्य यांच्यातील नात्याविषयी गहन होत असलेले माझे ज्ञान व माझा अनुभव यांमुळे, मला अन्य एका अभ्यासामध्येदेखील साहाय्य मिळते, जो सिद्धयोग मार्गाचा एक मूलभूत अभ्यास आहे. दर्शन.

श्रीगुरूंचे दर्शन घेणे हा एक असा अभ्यास आहे जो मी दररोज करते. मी या गोष्टीसाठी कृतज्ञ आहे की, जीवनाच्या या समयी मला अशा स्थानी राहून सेवा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले आहे, जिथे माझ्या श्रीगुरू निवास करत आहेत. साक्षात रूपाने श्रीगुरुमाईंचे दर्शन घेणे हे माझ्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे आहे—*त्याबरोबरच* मी श्रीगुरुमाईंनी प्रदान केलेल्या मार्गदर्शनाविषयीदेखील जागरूक राहते की, आपल्याला असंख्य पद्धतींनी श्रीगुरूंचे दर्शन होऊ शकते.

दर्शनाची अनुभूती ही अंतरी होते. मला ठाऊक आहे की, अनेक सिद्धयोगी व नवीन साधक जेव्हा त्या क्षणाचे स्मरण करतात, ज्या वेळी श्रीगुरूंनी त्यांच्यावर दृष्टिपात केला होता, तेव्हा त्यांना दर्शनाची अनुभूती होते—श्रीगुरू आपल्याला ज्या प्रकारे पाहतात, तेव्हा श्रीगुरूंची ती दृष्टी, त्यांनी तसे *पाहणे* ही अनुभूती अंतरी कशी जाणवते याची कल्पना जेव्हा ते करतात, तेव्हा त्यांना दर्शनाची अनुभूती होते. जेव्हा ते श्रीगुरूंच्या मौनात निमग्न होतात, त्या मौनात जे त्यांच्या स्वतःच्या आत्म्याच्या मौनाचेच दुसरे

नाव आहे, तेव्हा त्यांना दर्शनाचा अनुभव होतो किंवा ते जेव्हा श्रीगुरूंच्या प्रज्ञानाचे आवाहन करतात, तेव्हा त्यांना दर्शनाची अनुभूती होते. त्यांना दर्शनाची अनुभूती तेव्हा होते, जेव्हा ते मनातल्या मनात अशी कल्पना करतात की, ते श्रीगुरूंच्या समक्ष आहेत आणि जेव्हा ते अंतर्मुख होऊन स्वतःच्या हृदयात श्रीगुरूंची उपस्थिती अनुभवतात, जी अत्यंत सूक्ष्म असूनही अगदी स्पष्ट असते. श्रीगुरुमाईंनी सांगितले आहे, "दर्शनाचा अभ्यास हा स्वतःच एक शास्त्रग्रंथ आहे."

श्रीगुरुगीतेच्या या श्लोकाचे स्मरण करून मी समापन—किंवा कदाचित *आरंभ* करू इच्छिते, कारण संपूर्ण महिनाभर सुरू राहणाऱ्या गुरुपौर्णिमेच्या महोत्सवाचा शुभारंभ करून आपण हेच तर करत आहोत. मी या श्लोकाची निवड यासाठी केली, कारण मी इथे ज्याविषयी सांगते आहे, त्यासाठी हा श्लोक अगदी समर्पक वाटतो.

या श्लोकात आदिगुरु, भगवान शिव देवी पार्वतीला सांगतात :

मन्त्रराजमिदं देवि गुरुरित्यक्षरद्वयम् ।
स्मृतिवेदार्थवाक्येन गुरुः साक्षात्परं पदम् ॥

हे देवी, दोन अक्षरे असलेला शब्द 'गुरू' हा महामंत्र आहे.
श्रुती [वेद] आणि स्मृतीदेखील सांगतात की,
गुरू हे साक्षात परम पद म्हणजे परम तत्त्व आहेत.[१]

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] श्रीगुरुगीता, श्लोक १०७; स्वाध्याय सुधा, [चित्शक्ति पब्लिकेशन्स, २०२३], पृ. ५४. इंग्रजी भाषांतर © २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®.